# शहीद दिन

## शिवराम हरी राजगुरू : (दि. २४ ऑगस्ट, १९०८ – २३ मार्च, १९३१)

(अल्प परिचय)

भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील सशस्त्र क्रांतिकारक. त्यांचा जन्म मध्यमवर्गीय कुटुंबात पुणे जिल्ह्यात खेड येथे झाला. प्राथमिक शिक्षणानंतर ते अमरावतीस गेले. तेथे हनुमान व्यायाम शाळेच्या वातावरणात त्यांनी देशभक्तीची दीक्षा घेतली. वयाच्या १५ व्या वर्षी ते बनारसला संस्कृत अध्ययनासाठी गेले. तेथे न्यायशास्त्रातील *मध्यमा* परीक्षा ते उत्तीर्ण झाले. "*लघु सिध्दान्त कौमुदी*" चा त्यांनी अभ्यास केला. त्यांना संस्कृत व मराठीखेरीज इंग्रजी, कन्नड, मलयाळम, हिंदी व उर्दू या भाषाही चांगल्या अवगत होत्या. बनारसला असतानाच त्यांची सचिन्द्रनाथ संन्याल, चंद्रशेखर आझाद आदी क्रांतिनेत्यांशी ओळख झाली. "हिंदुस्थान रिपब्लिकन आर्मी" मध्ये दाखल होऊन त्यांनी उत्तर भारतात क्रांतीकार्यात भाग घेतला. रघुनाथ या टोपणनावाने ते प्रसिद्ध होते. पुढे "हिंदुस्थान सोशलिस्ट रिपब्लिकन आर्मी" सुरू झाल्यावर ते या क्रांतिसैन्याचे सैनिक बनले. त्यांचा बंदुकीचा नेम अचूक होता.

सायमन कमिशन विरोधी निदर्शनात पोलीस हल्ल्यात लाला लजपतराय जबर जखमी झाले. त्यामुळे दिनांक १७ नोव्हेंबर, १९२८ रोजी या थोर पंजाबी नेत्याला मृत्यू आला. त्यांच्या मृत्यूचा बदला घेण्याचा पंजाबी क्रांतिनेत्यांनी निर्धार केला. यासाठी चंद्रशेखर आझाद, शिवराम राजगुरू, भगतसिंग आणि जयगोपाल यांची नेमणूक करण्यात आली. ब्रिटिश पोलीस अधिकारी सॉंडर्स याच्यावर लाहोरला दिनांक १७ डिसेंबर, १९२८ रोजी हल्ला झाला, तेव्हा पहिल्या दोन गोळ्या राजगुरूंनी झाडल्या. सॉंडर्स वधानंतर २२ महिन्यांनी म्हणजे दिनांक ३० सप्टेंबर, १९२९ रोजी राजगुरूंना पुण्यात अटक झाली. त्यांना भगतसिंग, सुखदेव यांच्याबरोबर लाहोरच्या तुरुंगात फाशी देण्यात आले. त्यांच्या स्मरणार्थ खेड या त्यांच्या जन्मगावाचे "राजगुरूनगर" असे नामांतर करण्यात आले आहे.

*****

(स्रोत – सचिव, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ)